वाचले :-

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२०/प्र.क्र.३६१/नवि-२२, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२१
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१
३. पदोन्नती समिती सभा दि.०४/०२/२०२५ चा सभावृत्तांत
४. सामान्य प्रशासन विभागाकडील दि. ११/०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/१०६/२०२५
दिनांक ११/०२/२०२५

**विषय :- 'उप अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२०/प्र.क्र.३०१५/नवि-२२, दि.३०.०८.२०१९ पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर '**उप अभियंता (शहरी दळणवळण विभाग)**' अभिनामाची पदे **पे लेवल S-२० वेतनश्रेणी र.रु ५६१००-१७७५००** मध्ये शासन मंजूर आहेत. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२०/प्र.क्र.३६१/नवि-२२, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२१ अन्वये '**उप अभियंता (शहरी दळणवळण विभाग)**' करीता पदोन्नतीचे निकष मंजूर करण्यात आलेले आहेत.

'**उप अभियंता (शहरी दळणवळण विभाग)**' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/०२/२०२५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने उपरोक्त शासन निर्णयानुसार पदोन्नतीपूर्व **'कनिष्ठ अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** पदावरील खालील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून तसेच पदोन्नती संदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिका तसेच दिनांक ०७/०५/२०२१ चे शासन निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार '**उप अभियंता (शहरी दळणवळण विभाग)**' पदावर **पे लेवल S-२० वेतनश्रेणी र.रु ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | अधिकारी नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कुदळे संतोष पंडित | ज्येष्ठतेनुसार | शहरी दळणवळण विभाग |

सबब, उपरोक्त नमूद बाबी विचारात घेता, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त नमुद अधिकारी यांना **उप अभियंता(शहरी दळणवळण विभाग)** अभिनामाचे पदावर **पे लेवल S-२० वेतनश्रेणी र.रु ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीमध्ये ज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात

आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त अधिकारी यांना स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित
प्रत-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लेखा विभाग | २) | लेखापरिक्षण |
| ३) | सर्व संबंधित विभाग | ४) | प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष |

उप आयुक्त, (साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,